**आजचा शुभ विचार**

"नशिबावर विश्वास ठेवण्यापेक्षा स्वतःच्या ताकदीवर विश्वास ठेवा."आपण जे करतोय किंवा आपल्यात जी ताकद आहे ती ओळखायला शिका. नशिबावर निर्भर राहू नका.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर



RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!






मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-53 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Saturday 28 June 2025 ▪ PAGES 4 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक ५३ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ शनिवार, दि. २८ जुन २०२५ ▪ पाने ४ ▪ ₹ ४ रुपये


## मोर्चासाठी एकत्र येणारे ठाकरे बंधू राजकारणात हात मिळवणार का? संजय राऊतांचं सूचक उत्तर

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------------



राज्यातील प्राथमिक शाळांमध्ये हिंदी भाषा शिकवण्याच्या फडणवीस सरकारच्या निर्णयाविरोधात ठाकरे बंधू आक्रमक झाले आहेत. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी ५ जुलै रोजी मुंबईतील गिरगाव चौपाटी ते आझाद मोदान असा मोर्चा काढणार असल्याची घोषणा केली आहे. या मोर्चात शिवसेना (ठाकरे) देखील सहभागी होणार आहे. शिवसेना (ठाकरे) खासदार संजय राऊत यांनी राज व उद्धव ठाकरे एकत्र या मोर्चात सहभागी होणार असल्याची घोषणा केली आहे.

दरम्यान, हिंदी भाषेच्या सक्तीविरोधातील मोर्चासाठी एकत्र येणारे ठाकरे बंधू राजकारणात हात मिळवणार का? मराठी अस्मिता हा राज व उद्धव ठाकरे राजकीयदृष्ट्या एकत्र येण्याचा मुद्दा असू शकतो का? असा प्रश्न विचारल्यावर संजय राऊत म्हणाले, "राज व उद्धव ठाकरे हे मनाने एकत्र आलेलेच आहेत. सध्या भाषा हा महत्त्वाचा विषय आहे. मराठी अस्मिता, मराठी माणसाचा स्वाभिमान टिकवण्यासाठी मुंबईवरील आक्रमणाविरोधात सर्वांनी एकत्र यायला हवं".

संजय राऊत म्हणाले, "आपण याआधी संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यासाठी राजकीय मतभेद विसरून एकत्र आलो होतो. त्याच प्रकारचा लढा उभारण्याची आज देखील गरज आहे असं दोन्ही ठाकऱ्यांना वाटतं. यात मला काहीच चुकीचं वाटत नाही. मराठीविरोधात, मुंबईला महाराष्ट्रापासून तोडण्यासाठी, मुंबईतील मराठी माणूस हद्दपार करण्यासाठी प्रयत्न होत आहेत. ६५ वर्षांपूर्वी असेच प्रयत्न होत होते. तेव्हा संयुक्त महाराष्ट्र कृती समिती स्थापन झाली आणि सर्व पक्षांनी, संघटनांनी मिळून लढा दिला. तसाच लढा आता देखील द्यावा लागेल. या लढ्याचं नेतृत्व शेवटी ठाकऱ्यांनाच करावं लागेल. या मोर्चात सहभागी होण्यासाठी आम्ही सर्व पक्ष व संघटनांना निमंत्रण पाठवणार आहोत. शिवसेनेचे (ठाकरे) खासदार म्हणाले, "महाविकास आघाडीतील सर्व घटकपक्षांना आम्ही या मोर्चाचं निमंत्रण देऊ. कारण हा काही राजकीय लढा नाही. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या (शरद पवार) खासदार सुप्रिया सुळे यांनी देखील हिंदीच्या सक्तीविरोधात भूमिका घेतली आहे. तर, कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचीही तीच भूमिका आहे. राजकीय जोडे बाजूला ठेवा आणि मराठीसाठी एकत्र या असं आवाहन दोन्ही ठाकऱ्यांनी सर्वांना केलं आहे. हेच महाराष्ट्राच्या हिताचं आहे आणि मराठी माणसाच्या मनातही तेच आहे".


**महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक स्वराज्यदूत वृत्तपत्रातर्फे राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन !**

स्वराज्यदूत गौरव पुरस्कार

कर्तृत्वाचा सन्मान... स्वराज्याचा मान !!



महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी, सहकार, उद्योग, वैद्यकीय, पत्रकारिता (वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक / डिजीटल मीडिया), युवक, महिला, कला, साहित्य, क्रीडा, पर्यावरण, ग्रामविकास अशा विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनिय कार्य करणाऱ्या संस्था व मान्यवर व्यक्तींच्या कार्याचा विशेष सन्मान करून भावी वाटचालीस तसेच उल्लेखनिय कार्य करण्यासाठी प्रेरणा मिळावी म्हणून दैनिक स्वराज्यदूतने हा पुरस्कार आयोजित केलेला आहे.

कौतुक तुमच्या कार्याचे

दैनिक स्वराज्यदूत SWARAJYADOOT www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!

SWARAJYADOOT LIVE

दैनिक वृत्तपत्र वृत्त वाहिनी

ऑगस्ट महिन्यात नाशिक येथे अतिशय भव्य-दिव्य समारंभात पुरस्कार वितरण नियोजित

**प्रस्ताव पाठविण्यासंदर्भात सूचना**

- संपूर्ण प्रस्ताव pdf स्वरुपात संगणकावर तयार केलेल्या स्वरुपात दि. ३१ जुलै २०२५ पर्यंत dainikswarajyadoot@gmail.com या इ-मेल वर पाठवायचा आहे.
- फक्त निवड झालेल्या व्यक्तींना प्रस्तावाची प्रिंट स्वरुपात (Hard copy) जमा करावी लागेल.
- प्रस्ताव पूर्णपणे मोफत स्वीकारले जातील. कोणताही आर्थिक मोबदला देण्याचा प्रयत्न करू नये. पुरस्कारासाठी कुणाशीही आर्थिक व्यवहार करू नये.
- दैनिक स्वराज्यदूत परिवाराशी संबंधित व्यक्ती, प्रतिनिधी यांना प्रस्ताव पाठवता येणार नाहीत.
- जिल्हा परिषद कर्मचारी, राज्य व केंद्र सरकारचे कर्मचारी यांचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाही.

अधिक माहितीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.
8446673677 / 8010232449


## समृद्धी महामार्गावर भीषण अपघात, आलिशान मर्सिडीजने 3 वेळा पलटी घेतली

### नाशिकच्या प्रसिद्ध उद्योजकाचा मृत्यू; वेळेवर उपचार न मिळाल्याने मृत्यू

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------



समृद्धी महामार्गावर भीषण अपघाताची आणखी एक घटना समोर आली आहे. या अपघातामध्ये बांधकाम व्यवसायिकाचा दुर्दैवी मृत्यू झाला. नाशिकचे प्रसिद्ध उद्योजक सुनील हेकरे यांचा अपघातात मृत्यू झाला असून, त्यांची पत्नी व दोन मुलं गंभीर जखमी झाले आहेत. अपघातग्रस्तांना तात्काळ वैद्यकीय मदत न मिळाल्यामुळे हेकरे यांचा मृत्यू झाल्याचा आरोप त्यांच्या नातेवाईकांनी केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी सुनील हेकरे आणि त्यांचे कुटुंबीय मुंबईहून नाशिककडे आलिशान मर्सिडीज गाडीतून प्रवास करत होते. मात्र, समृद्धी महामार्गावर इगतपुरी बोगद्याच्या पुढे शहापूर हद्दीत त्यांच्या गाडीला अपघात झाला. अपघात इतका भीषण होता की, गाडीने ३ वेळा पलटी मारली आणि सुनील हेकरे हे गाडीतून बाहेर फेकले गेले. डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने आणि प्रचंड रक्तस्रावामुळे त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला, अशी माहिती डॉक्टरांनी दिली आहे.

सुनील हेकरे यांचे बंधू अनिल हेकरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, समृद्धी महामार्गावर अपघाताच्या ठिकाणी पाणी साचले होते. त्यामुळे गाडीचा ताबा सुटून अपघात झाला. "महामार्गावरील बांधकामाची गुणवत्ता निकृष्ट असून, अपघातानंतर वेळेवर वैद्यकीय मदत मिळाली नाही," असा गंभीर आरोप त्यांनी केला आहे.

दरम्यान, समृद्धी महामार्गावरील इगतपुरी-आमणे या ७६ किमी लांबीच्या चौथ्या आणि शेवटच्या टप्प्याचे लोकार्पण झाल्यानंतर अवघ्या काही दिवसांत समृद्धी महामार्गावर अपघातांच्या घटना वाढल्या आहेत. या महामार्गावर दररोज छोटे-मोठे अपघात होत आहेत. त्यामुळे हा नवा मार्ग हा अपघाती मार्ग ठरतोय का? असा सवाल आता उपस्थित होत आहे. मागील आठवड्यात कसारा-शहापूर तालुक्यातील वाशिंद पोलीस स्टेशनच्या हद्दीत समृद्धी महामार्गावर क्रुझर जीप आणि ट्रकमध्ये झालेल्या भीषण अपघातात दोन जणांचा मृत्यू तर सात जण जखमी झाले होते. ही दुर्घटना वाशिंद आणि आमने दरम्यान घडली होती.

## मुख्यमंत्र्यांच्या ताफ्यातील १९ वाहनांमध्ये डिझेलऐवजी भरलं पाणी, गाड्या बंद पडल्याने पोलिसांची धावपळ; पेट्रोल पंपावर मोठी कारवाई

विशेष वृत्तसेवा
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------



मध्य प्रदेशमध्ये एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांच्या ताफ्यातील १९ वाहनांमध्ये डिझेलऐवजी पाणी भरल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकारामुळे मुख्यमंत्री मोहन यादव यांच्या ताफ्यातील १९ वाहने अचानक बंद पडल्याचं पाहायला मिळालं. तसेच या घटनेमुळे पोलीस प्रशासनाचीही चांगलीच धावपळ उडाली. या घटनेनंतर संबंधित पेट्रोल पंपावर मोठी कारवाई करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.रम्यान, या घटनेनंतर संबंधित पेट्रोल पंपावर मोठी कारवाई करण्यात आली आहे. मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांच्या ताफ्यातील १९ इनोव्हा कार गुरुवारी रात्री डिझेल भरण्यासाठी रतलाम जिल्ह्यातील एका पेट्रोल पंपावर थांबल्या होत्या. तेव्हा ताफ्यातील १९ इनोव्हा कारमध्ये डिझेल भरलं. त्यानंतर ताफा काही अंतरावर गेल्यानंतर एकाचवेळी सर्व गाड्या अचानक बंद पडल्या. ताफ्यातील १९ गाड्या एकाचवेळी बंद झाल्यामुळे मुख्यमंत्र्यांबरोबर असलेल्या पोलिसांनाही प्रश्न पडला. यावेळी पोलिसांची चांगलीच धावपळ उडाली. ताफ्यातील सर्व गाड्या अचानक बंद पडल्यामुळे मुख्यमंत्री मोहन यादव यांच्या नियोजित कार्यक्रमाला वेळेत पोहोचवण्यासाठी पोलिसांची तारांबळ उडाली. दरम्यान, या घटनेचा एक व्हिडीओ देखील समोर आला आहे. या व्हिडीओमध्ये ताफ्यातील काही गाड्या चालक आणि पेट्रोल पंप कर्मचाऱ्यांकडून गाड्या ढकलण्यात येत असल्याचं दिसत आहे. संबंधित गाड्यातील डिझेलमध्ये पाणी आढळून आल्यानंतर संबंधित पेट्रोल पंप स्थानिक प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी तातडीने सील केला आहे. तसेच या घटनेनंतर प्रशासनाने इंधनाचे नमुने गोळा केले आणि तपासले असता डिझेलमध्ये पाण्याचा समावेश असल्याचं आढळून आलं. या संदर्भातील वृत्त पीटीआयच्या हवाल्याने हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे. दरम्यान, मुख्यमंत्री मोहन यादव यांच्या ताफ्यातील एका कार चालकाने सांगितलं की, "वाहने इंदूरहून रतलामला येत होती आणि पेट्रोल पंपावर इंधन भरण्यासाठी थांबली होती. वाहनांमध्ये डिझेल भरल्यानंतर काही वाहने निघून गेली आणि १ किमी प्रवास केल्यानंतर अनेक वाहनांत अचनाक बिघाड झाला."

## पंचवटी एक्स्प्रेसमध्ये पासधारकांचा राजेशाही प्रवास, अन्य प्रवाशांचे मात्र हाल गर्दीत उभे राहण्याची शिक्षा

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------



मनमाड ते मुंबई पंचवटी एक्स्प्रेसमध्ये मासिक पासधारक (एमएसटी) बोगीत आरामशीर झोपून प्रवास करण्यात येत असताना दुसरीकडे अन्य डब्यांमध्ये गर्दीत तिकीटधारकांना उभे राहून, दरवाजाजवळ बसून प्रवास करावा लागत आहे. पासधारक बोगीत कितीही आसने रिक्त असली तरी तिथे इतरांना प्रवेश नसतो. पासधारकांच्या दादागिरीसमोर रेल्वे प्रशासनही हतबल झाल्याचे चित्र आहे.

मनमाड-नाशिक-मुंबई दरम्यान दररोज धावणाऱ्या पंचवटी एक्स्प्रेसवर जिल्ह्यातील चाकरमान्यांची मुख्य भिस्त आहे. त्यांच्यासाठी या रेल्वेगाडीत वातानुकूलीत एक आणि सर्वसाधारण दोन अशा एकूण तीन बोगी राखीव आहेत. यामध्ये प्रामुख्याने रविवारची सुट्टी संपल्यानंतर सोमवारी मुंबईला जाताना तसेच शुक्रवारी रात्री मुंबईहून नाशिकला सुट्टीसाठी परतणाऱ्या नोकरदारांची गर्दी असते. दैनंदिन ये-जा करणाऱ्या पासधारकांचे प्रमाण तुलनेत कमी आहे. त्यामुळे हे दोन दिवस वगळता इतर दिवशी या तिन्ही डब्यांत फारशी गर्दी नसते. ३० ते ४० टक्के आसने रिक्त असतात. त्यामुळे काही पासधारक तीन आसनांची जागा व्यापून अक्षरशः झोपून प्रवास करतात. ही बाब या बोगीतील छायाचित्रांवरून उघड झाली.

पंचवटी एक्स्प्रेसमध्ये मुंबईला ये-जा करणारे विद्यार्थी आणि इतर प्रवाशांची संख्या मोठी आहे. जागेअभावी अनेकांना उभे राहून प्रवास करावा लागतो. काही जण दारात बसतात. मासिक पासधारकांच्या डब्यात अनेक आसने रिक्त असूनही त्यांना तिथे प्रवेश मिळत नाही. प्रवेश तर दूर, तेथील दरवाजात साधे उभे राहू दिले जात नसल्याचे प्रवासी सांगतात. एका प्रवाशाने वातानुकुलीत श्रेणीत आपले तिकीट अद्ययावत करण्याची तयारी दर्शविली होती. पासधारकांनी तपासनीसकावर दबाव टाकून प्रतिबंध केल्याचा काहींचा अनुभव आहे. रेल्वे प्रवाशांना एमएसटी पासधारकांच्या दादागिरीला सामोरे जावे लागत असल्याची तक्रार संबंधित प्रवाशाने रेल्वेमंत्र्यांकडे केली होती. त्यावर नेमकी काय कारवाई झाली, हे गुलदस्त्यात आहे. कारण. परिस्थितीत कुठलाच फरक पडलेला नाही. मासिक पासधारकांची संख्या तीन हजाराच्या आसपास सांगितली जाते. मात्र. यातील बहुतेक दैनंदिन प्रवास करीत नाहीत. संबंधितांना महिनाभराचा पास ७०० रुपयांत मिळतो. तर अन्य प्रवाशांना एका बाजूच्या प्रवासासाठी ११० रुपये मोजावे लागतात.

**पंचवटी एक्स्प्रेसमधील प्रकाराबाबत आमच्याकडे तक्रार आलेली नाही. सर्वसाधारणपणे पासधारकांची बोगी त्यांच्यासाठीच राखीव असते. तिथे काही जागा रिक्त असतील तर अन्य तिकीटधारकांना फरकाची रक्कम भरून आसन उपलब्ध करता येते, असा नियम आहे.**

**इति पांडे (विभागीय रेल्वे व्यवस्थापक, भुसावळ)**

सम्पादकीय

# मुंबईत श्रीमंतांची संख्या वाढली

गेल्या ११ वर्षांत, स्टार्टअप्स, विज्ञान, क्रीडा, सामुदायिक सेवा, संस्कृती आणि इतर विविध क्षेत्रांमध्ये अकल्पनीय कामगिरी करणाऱ्या तरुणांची उल्लेखनीय उदाहरणे आपण पाहिली आहेत. त्याच्याच एक पाऊल पुढे जाऊन गेल्या आठवड्यात क्रीसीलच्या सहकार्याने ३६० वन वेल्थ क्रियेटर लिस्टचा पहिला अंक प्रसिद्ध केला गेला. ही भारतातील आघाडीच्या संपत्ती आणि मालमत्ता व्यवस्थापन करणाऱ्या कंपन्यांपैकी एक आहे. या यादीमध्ये किमान ५ अब्ज रुपये किंवा त्याहून अधिक संपत्ती असलेल्या व्यक्तींचा समावेश आहे. या यादीत एकूण २ हजार १३ संपत्ती निर्माण करणाऱ्यांचा समावेश आहे. मुंबई ही आर्थिक राजधानी म्हणून आघाडीवर असून येथे ५७७ संपत्ती निर्माण करणारे राहतात आणि या यादीतील एकूण संपत्तीच्या ४०% वर नियंत्रण ठेवतात त्यामध्ये उद्योजक, व्यावसायिक, गुंतवणूकदार आणि वारसदार असून त्यांची एकत्रित संपत्ती सुमारे १०० ट्रिलियन रुपये एवढी आहे. देशाच्या जीडीपीच्या एक तृतीयांश इतकं हे प्रमाण आहे. यामधील मध्यम संपत्ती १४.२ अब्ज रुपये म्हणजेच १ हजार ४२३ कोटी रुपये इतकी आहे. यात आकाश अंबानी आणि अनंत अंबानी हे ३.५९ लाख कोटी रुपयांच्या संपत्तीसह सर्वात श्रीमंत भारतीय म्हणून अग्रणी आहेत. १६१ व्यक्तींची संपत्ती प्रत्येकी १०० अब्ज रुपयांपेक्षा जास्त आहे, तर १६९ व्यक्तींची संपत्ती ५० अब्ज रुपये ते १०० अब्ज रुपये दरम्यान आहे. टाटा ग्रुप, रिलायन्स इंडस्ट्रीज आणि अदानी ग्रुपशी संबंधित कुटुंबीय आणि प्रवर्तक मिळून सुमारे २४% प्रवर्तक संपत्तीचे प्रतिनिधित्व करतात. ही संपत्ती अंदाजे ३६ लाख कोटी रुपये इतकी आहे. ३६० वन वेल्थ क्रियेटर लिस्ट ही भारताच्या आर्थिक भवितव्याला आकार देणाऱ्या व्यक्ती आणि कुटुंबांची नोंद घेणारा एक मैलाचा दगड ठरणारा उपक्रम आहे. नवी दिल्ली आणि बंगळूरुमध्ये अनुक्रमे १७% आणि ८% संपत्ती निर्माते आहेत, तर अहमदाबादमध्ये सर्वात श्रीमंत भारतीयांपैकी ५% राहतात. भारतात ४० वर्षांखाली १४३ सक्रिय संपत्ती निर्माण करणारे आहे. त्यापैकी अनेकजण डिजिटल-प्रथम व्यवसाय मॉडेल्समध्ये अग्रणी आहेत. यामध्ये भारत पेचे शाश्वत नक्राणी हे २७ वर्षांचे असून सर्वात तरुण आहे. ही यादी केवळ श्रीमंतांची नसून ती भारताच्या उद्योजकीय आकांक्षा, पिढ्यानपिढ्या चालत आलेली वारसा परंपरा आणि उदयास येणाऱ्या आर्थिक प्रवाहाच प्रतिबिंब आहे. भारतातील अग्रणी ५० व्यावसायिक घराणी ३६० वन वेल्थ क्रियेटर लिस्टमध्ये नोंदवलेल्या एकूण संपत्तीपैकी सुमारे ५९% संपत्तीवर नियंत्रण ठेवतात. केवळ रिलायन्स इंडस्ट्रीज आणि अदानी एंटरप्रायझेस या दोन कंपन्यांचं एकत्रित योगदान एकूण संपत्तीपैकी १२% इतकं आहे.

३६० वन वेल्थ क्रियेटर लिस्टवरील सुमारे ७१% व्यक्ती पुरुष आहे आणि त्यांच्याकडे एकूण संपत्तीपैकी ७६% मालकी आहे. महिलांचं औषधनिर्मिती क्षेत्रात अधिक चांगलं प्रतिनिधित्व असून तिथे त्या फार्मा क्षेत्रातील अब्जाधीशांपैकी ३३% आहे. दुसरीकडे, वित्तीय क्षेत्रातील रुपयातील अब्जाधीशांपैकी २४ % महिला आहे आणि त्या क्षेत्राच्या प्रवर्तक संपत्तीपैकी १३% चे प्रतिनिधित्व करतात. पुरुषांची मध्यम संपत्ती १ हजार ४७५ कोटी रुपये असून, ती महिलांच्या १ हजार २१५ कोटी रुपये मध्यम संपत्तीपेक्षा २२% अधिक आहे. सरासरी संपत्तीच्या बाबतीत, वारसाहक्काने संपत्ती प्राप्त केलेल्या महिला त्यांच्या पुरुष समकक्षांपेक्षा सुमारे २३% अधिक श्रीमंत आहेत. याचे एक कारण असे आहे की, मिड-कॅप आणि स्मॉल-कॅप व्यवसायांच्या मालकांच्या तुलनेत १०० अब्ज रुपये संपत्ती असलेल्या व्यक्तींनी; विशेषतः मुकेश अंबानी आणि शिव नाडार यांनी त्यांच्या पुरुष आणि महिला वारसांमध्ये अधिक समतोल पद्धतीने संपत्ती हस्तांतरित केली आहे. ३६० O N E W e a l t h Creators List वरील महिला वारसांपैकी १०% महिला १०० अब्ज रु. संपत्ती गटात मोडतात. भारतातल्या एकूण संपत्ती निर्मितीमध्ये औषधनिर्माण, माहिती तंत्रज्ञान सॉफ्टवेअर ॲण्ड सर्व्हिसेस आणि वित्तीय सेवा या तिन्ही क्षेत्रांचा मिळून सुमारे २६ % वाटा आहे. यामध्ये फार्मा क्षेत्राने सर्वाधिक म्हणजे १७४ संपत्ती निर्माते यांसह आघाडी घेतली आहे. त्यानंतर वित्तीय सेवा १५८ आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात १३४ जण आहेत. फार्मा क्षेत्रातील सर्वात श्रीमंत उद्योजक दिलीप शांतिलाल संघवी आहेत, तर फायनान्शियल सर्व्हिसेसमध्ये नितीन कामत आणि निखिल कामत हे सर्वात श्रीमंत आहेत. तंत्रज्ञान क्षेत्रात अझीम एच. प्रेमजी हे सर्वोच्च स्थानी आहेत. बँकिंग क्षेत्रात दर व्यक्तीमागे सरासरी संपत्ती ८ हजार ५०० कोटी, दूरसंचार क्षेत्रात ८ हजार ४०० कोटी, विमानवाहतूक क्षेत्रात ७ हजार ९०० कोटी रु. आहे. बँकिंग क्षेत्रात १३ अब्जाधीश रु. असणारे आहेत, दूरसंचारमध्ये २१, विमानवाहतूक क्षेत्रामध्ये ९ जण आहेत. भारताच्या सर्वात श्रीमंत व्यक्तींची संपत्ती सूचिबद्ध कंपन्यांमध्ये केंद्रित आहे. ६०७ सार्वजनिकरीत्या सूचिबद्ध कंपन्या १ हजार ७२६ व्यक्तींच्या एकूण वैयक्तिक संपत्तीपैकी ९३% हिस्सा दर्शवतात.

३६० वन वेल्थ क्रियेटर लिस्टवरील वाढत्या संख्येतील व्यक्ती त्यांच्या स्वतःच्या व्यवसाय साम्राज्याच्या पलीकडे बघत असून देशातील स्टार्टअप इकोसिस्टममध्ये भर घालत आहेत: यादीतील ५८ जण आणि त्यापैकी ९०% हे पहिल्या पिढीतील उद्योजक असून त्यांनी अशा प्रारंभिक टप्प्यातील स्टार्टअप्समध्ये गुंतवणूक केली आहे. ते आता युनिकॉर्न किंवा सूनीकॉर्न स्थानापर्यंत पोहोचले आहेत. भारताच्या ३० संपत्ती निर्मात्यांपैकी २८ पहिल्या पिढीतील उद्योजक बायोफार्मा, बायोटेक, फिनटेक, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, सॉफ्टवेअर-ॲज-अ-सर्व्हिस आणि मानवरहित हवाई यंत्रणा किंवा ड्रोन्स यांसारख्या अत्याधुनिक नवकल्पनांमधून संपत्ती निर्माण करत आहेत. या यादीत एकूण ५४० महिलांचा समावेश आहे.

ईशा अंबानी या महिलांमध्ये सर्वात श्रीमंत व्यावसायिक मालक आहेत. याव्यतिरिक्त, या यादीत ७२ अशा महिला नेतृत्वकर्त्यांची नोंद झाली. या ७२ महिला नेतृत्वकर्त्यांपैकी २९ जणींनी आरोग्यसेवा, औषधनिर्माण, आयटी आणि अभियांत्रिकी क्षेत्रांमध्ये आपली छाप सोडली आहे, तर २१ जणी पहिल्या पिढीतील उद्योजिका आहेत. या पहिल्या पिढीतील महिला नेतृत्वकर्त्यांनी ई-कॉमर्स सोल्यूशन्स, माहिती तंत्रज्ञान सॉफ्टवेअर ॲण्ड सर्व्हिसेस आणि फायनान्शियल सर्व्हिसेस यावर विशेष लक्ष केंद्रित केले असून, पहिल्या पिढीतील महिला नेतृत्वकर्त्यांच्या एकूण संपत्तीपैकी ७२ % वाटा या क्षेत्रांमधून आलेला आहे. हा अहवाल तयार करण्यात ३६० वन वेल्थ क्रियेटर लिस्ट संस्थापक, व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी करण भगत, यतीन शाह, क्रीसील इंटेलिजन्सच्या अध्यक्ष व व्यवसाय प्रमुख प्रीती अरोरा यांचा प्रमुख वाटा आहे. भारत हा जगातील तिसरा सर्वात मोठा स्टार्टअप इकोसिस्टम आहे, ज्यामध्ये तरुणाई आघाडीवर आहे. भारतातील स्टार्टअप इकोसिस्टम तरुणांमुळे अभूतपूर्व वेगाने भरभराटीला येत आहे. हे केवळ महानगरांपुरते मर्यादित नाही, तर ती आता एक सामाजिक संस्कृती बनली आहे, असे मोदी म्हणाले. हेच खरे आहे.

# कलाल-कलार समाजाचे भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळाचे घोडे अडले कुठे!



राज्यात काही समाजांनी कोणताही संघर्ष न करता त्यांना तडकाफडकी आर्थिक विकास महामंडळ प्राप्त झाले यांचेही आम्ही स्वागत करतो. कारणं यामुळे समाजाचा विकास होईल मग तो कोणताही समाज असो.परंतु गेल्या चार वर्षांपासून महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना आर्थिक विकास महामंडळासाठी संघर्ष करीत आहे व शासन दरबारी मागणी करीत आहे परंतु सरकार यावर दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येते.कलाल-कलार समाजाला भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ मिळावे यासाठी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथराव शिंदे,अतुलजी सावे यांना लेखी निवेदन सुध्दा देण्यात आले. सोबतच इतरही मंत्र्यांना निवेदन देण्यात आले आणि याबद्दल चर्चा सुध्दा झाली व त्यांनी ठोस आश्वासन सुध्दा दिले तुमच्या समाजाचा हा महत्त्वाचा प्रश्न आहे त्यामुळे कलाल- कलार समाजासाठी भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात येईल.परंतु सरकार तर्फे आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यासाठी कोणत्याही प्रकारची अधिकृत कारवाई किंवा हालचाली अजून पर्यंत सरकार मार्फत करण्यात आलेली नाही याची खंत व दु:ख समाजाला आहे. समाजाने मंत्री महोदयांना समक्ष निवेदन दिलेच सोबतच मेल व्दारे अनेक पत्र व्यवहार सुध्दा केले परंतु कलाल-कलार समाजाच्या हाती निराशा आली.एककीकडे सरकार कलाल-कलार समाजाला आर्थिक विकास महामंडळापासुन डावलत आहे तर दुसरीकडे सरकारने जाहीर केलेल्या समाजाचे आर्थिक विकास महामंडळ समाजाच्या विकासासाठी कार्य करीत आहे.याची आम्हाला खंत वाटते. कोणताही समाज असो प्रत्येक समाजाचा विकास व्हायलाच पाहिजे.यासाठी महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना नेहमीच स्वागतच करीत आली आहे.सरकारने ब्राह्मण समाजासाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन केले याचे स्वागतच.या महामंडळाचे अध्यक्ष आशिषजी दामले महामंडळाच्या माध्यमातून समाजासाठी काय-काय करता येईल यावर गांभीर्याने विचार करून समाजाच्या प्रती विकासाची गती वाढविण्याचे काम करीत आहेत.दिनांक २२ जून २०२५ ला कराड येथे अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या सभेत त्यांनी प्रत्येक जिल्ह्यात परशुराम भवन उभारण्याची घोषणा केली सोबतच पारंपरिक व्यवसाय (पौरोहित्य )करणाऱ्यांना संधी देण्याकरिता पुढील पाऊल उचलण्याचे त्यांनी जाहीर केले.दामलेंच्या कार्याचे आम्ही स्वागत करतो कारण ते समाजाला पुढे नेण्याचे कार्य करीत आहेत.हीच संधी महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटनेला सरकार का देत नाही? आम्हालाही वाटते की प्रत्येक जिल्ह्यात भगवान सहस्त्रार्जुन भवन बनावे व याचा फायदा समाजातील तळागाळातील गरीब समाज बांधवांना व्हावा.परंतु कलाल-कलार समाजाच्या प्रती सरकारचे घोडे कुठे अडले अजुन पर्यंत समजले नाही! आर्थिक विकास महामंडळाच्या बाबतीत पहिला हक्कदार कलाल-कलार समाज होता.परंतु सरकारने आर्थिक विकास महामंडळापासुन डावलल्याने समाज विकासापासुन दुरावल्या जात आहे.आज कलाल-कलार समाज अत्यंत मागासलेला आहे.कारण पारंपारीक व्यवसायांचा विचार केला तर फक्त १ टक्का पारंपरिक (मद्य) व्यवसाय आमच्या समाजाजवळ आहे व ९९ टक्के व्यवसाय पुंजीपती लोकांजवळ आहे त्यामुळे समाज पारंपरिक व्यवसायापासुन आजही कोसो दूर आहे.परंतु आज ९९ टक्के समाज बांधवांचे काय होईल याचा विचार सरकारने केला पाहिजे.समाजाच्या व्यथा आम्ही मंत्रीमहोदयांना समक्ष सांगितल्या सोबतच अनेक निवेदने सुध्दा दिलेत परंतु सरकार कलाल-कलार समाजाच्या प्रती उदासीन असल्याचे दिसून येते यामुळे समाज बांधवांच्या भावना दुखावल्या जात आहे. आताही वेळ गेलेली नाही सरकारने कलाल-कलार समाजाच्या व्यथा समजून घ्याव्यात व इतर समाजाप्रमाणे कलाल-कलार समाजासाठी भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ स्थापन करून समाजाला विकासाच्या प्रवाहात आणावे अशी मागणी महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटनेच्या वतीने माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना करण्यात येत आहे.माननीय देवेन्द्रजी फडणवीस अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेत आहेत यामध्ये मुख्यत्वेकरून आणिबाणीच्या काळातील बंदिवानांची पेंशन दुप्पट करण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे याचे स्वागतच याच धर्तीवर कलाल-कलार समाजाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून आपण एक पाऊल पुढे टाकुन कलाल-कलार समाजासाठी भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ स्थापन करून समाजाचा विकासाचा मार्ग मोकळा करावा अशी आग्रहाची विनंती संघटनेच्या वतीने सरकारला करण्यात येत आहे.

आपला

**रमेश लांजेवार**
**( प्रदेश प्रवक्ता )**
**(महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना)**
**नागपूर**

# नांदगाव शहरातील चांडक प्लॉट येथील नवीन पुलाचे लोकार्पण सौ. अंजुमताई कांदे यांच्या हस्ते संपन्न

सोमनाथ घोगांणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------------



आ.सुहास कांदे यांच्या माध्यमातून नांदगाव शहरातील चांडक प्लॉट भागातील व परिसरातील नागरिकांनी केलेल्या विनंती वर रेल्वे पुलाच्या बाजूला नवीन पूल बांधण्यात आला या पुलाचे लोकार्पण आज सौ अंजुमताई कांदे यांनी केले. चांडक प्लॉट एसटी कॉलनी गांधीनगर भोले नगर मार्केट या परिसरातील नागरिकांकरिता हा प्रमुख रस्ता असून नदीला पूर आल्यानंतर या भागातील नागरिकांचा शहराशी संबंध तुटून जातो आणि मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. मागील वर्षी नदीला आलेल्या पुरानंतर सदर परिस्थिती उद्भवली असता चांडक प्लॉट येथील रहिवाशांनी अंजुमताई कांदे यांना पूल बांधून देण्याची विनंती केली होती. सौ अंजुमताई यांनी यावेळी स्वतः चांडक प्लॉट येथे जाऊन रस्ता पाहणी केली होती व नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या होत्या यानंतर आ. सुहास कांदे यांच्याकडे सर्व परिस्थिती सांगितल्यानंतर सदर पुल मंजूर झाला आणि आज तो पूर्ण झाला असून लोकांच्या वापरासाठी त्याचे लोकार्पण करण्यात आले. याप्रसंगी पुला वरती रांगोळी काढण्यात आली होती फुग्यांनी पूल सजवण्यात आला होता, याप्रसंगी बोलताना नाना जाधव यांनी आमच्यासाठी हा पुल म्हणजे संजीवनी ठरणार आहे यामुळे आमच्या अनेक समस्या दूर होणार आहेत म्हणून आ.सुहास कांदे यांचे संपूर्ण परिसराच्या नागरिकांच्या वतीने आभार मानतो. महावीर पारख यांनी आपल्या मनोगतात आ.सुहास कांदे यांनी नागरिकांच्या समस्या जाणून घेत नांदगाव शहरात मोठा विकास घडवून आणल्याचे सांगितले. अंजुमताई कांदे यांनी आपण आमच्यावर विश्वास ठेवला आहे आपल्यासाठी काम करणे हे आमचे कर्तव्य आहे आणि म्हणूनच हा पूल झाल्याचा आपल्याला जेवढा आनंद होतोय तेवढा आम्हाला सुद्धा होत आहे असे मत व्यक्त केले. याप्रसंगी या पुलाचे कॉन्ट्रॅक्टर राजेंद्र परदेशी यांचा अंजुमताई कांदे यांनी सत्कार केला. याप्रसंगी व्यासपीठावर माजी नगराध्यक्ष राजेश कवडे, अरुण पाटील चेतन पाटील ' काका सोळसे, डॉ.सुनील तुसे, राजाभाऊ जगताप,डॉ यशवंत जाधव भारतीय जनता पार्टीचे दतराज छाजेड, , नांदगाव नगर पालिकेचे मुख्याधिकारी शामकांत जाधव ' सागर हिरे ' प्रकाश शिंदे 'सुनील जाधव, समाधान पाटील बाळासाहेब शेवरे ' साईनाथ पवार ' मनोज चोपडे ' चेतन शिंदे शिवसेना महिला आघाडी तालुकाप्रमुख विद्याताई जगताप मनमाड शहरप्रमुख संगीताताई बागुल नांदगाव शहर प्रमुख रोहिणी मोरे आदींसह परिसरातील रहिवासी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जब्बरटोला ग्रामपंचायतीचा पलटवार?

## 'पांढऱ्या तलावात' बेकायदेशीर अतिक्रमण अग्रवालवर कारवाईची मागणी तीव्र?

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

-----------------------

जब्बरटोला ग्रामपंचायतीच्या हद्दीत असलेल्या 'पांढऱ्या तलावात' सुरू असलेल्या बेकायदेशीर अतिक्रमणावर आता ग्रामपंचायतीने थेट कारवाईची मागणी करत प्रशासनाच्या भूमिकेवरच सवाल उपस्थित केले आहेत. "तलाव वाचवणार की अतिक्रमणास साथ देणार?" असा रोष संतप्त ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. सदर तलाव जिल्हा परिषद गोंदियाच्या ताब्यात असून, त्याचे कट क्र. ३३८ व ३४० हे असून, हा तलाव केवळ जबरटोला नव्हे तर आजूबाजूच्या ५-६ गावांचा जनावरांच्या पाण्याचा मुख्य स्त्रोत आहे.






८ एकरमध्ये माती भरून धुरा? ग्रामपंचायतीचा आरोप

ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार, अग्रवाल नावाच्या व्यक्तीकडून तलावाच्या पोटात अंदाजे ८ एकर जागेवर माती भरून धुरा-पार बनवण्याचा प्रयत्न सुरू आहे. यामुळे तलावाचे नैसर्गिक अस्तित्व आणि पाणी साठवण्याची क्षमता धोक्यात येत आहे.

ग्रामपंचायतीचे सरपंच मनीष सिंह गहेरवार यांनी स्पष्टपणे सांगितले – " तलावात कोणाच्याही नावावर जागा असली, तरी धुरा तयार करणे पूर्णत: बेकायदेशीर आहे. हे काम सरळसरळ अतिक्रमणात मोडते."

प्रशासन झोपले की हातमिळवणी? – ग्रामपंचायतीचा संशय

ग्रामपंचायतीने याबाबत तात्काळ तलाठी, तहसीलदार व यांना लेखी व तोंडी माहिती दिली. मात्र अद्याप कोणतीही कारवाई झालेली नसल्यामुळे प्रशासनाकडून संशयास्पद दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला जात आहे. विशेष म्हणजे, केवळ १५ दिवसांपूर्वीच लघुपाटबंधारे विभागाने तलावाचे खोलीकरण केले होते, आणि त्यानंतरच हे अतिक्रमण सुरू झाल्याने, यामागे नियोजनबद्ध संगनमताची शक्यता नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

**DLR प्रक्रियेनंतरही नियमभंग?**

ग्रामपंचायत सूत्रांनी स्पष्ट केले की, तलावाची जमीन ही DLR (डिजिटल लँड रेकॉर्ड) प्रक्रियेतून गेलेली असून देखील तिथे बेकायदेशीर काम सुरू असणे, ही गंभीर कायदेशीर चूक आहे. "जर कायद्याचे पालन ग्रामपंचायतीकडून होते, तर मग नियम तोडणाऱ्यांवर कारवाई न करण्यामागे नेमकं कोण उभं आहे?" – असा सवाल उपस्थित केला जातोय.

**तक्रारींचा धडाका**
**आंदोलनाचा इशारा**

ग्रामपंचायतीकडून याबाबत उद्या २७ जून रोजी जिल्हा धिकारी कार्याल यासह तहसील दार, तलाठी व जिल्हा परिषद यांच्याकडे लेखी तक्रारी दाखल करण्यात येणार आहेत. जर अद्यापही यावर कोणतीही कारवाई झाली नाही, तर ग्रामपंचायतीकडून आंदोलन छेडण्याचा तीव्र इशारा देण्यात आला आहे.

"पांढऱ्या तलावाचे पाणी, अस्तित्व आणि जनतेचा विश्वास वाचवा – अतिक्रमण थांबवा!" जब्बरटोला ग्रामस्थांचा एकमुखी आवाज

टीप: वरील माहिती ग्रामपंचायतीच्या आरोपांवर आधारित असून प्रशासनाच्या बाजूने अद्याप अधिकृत प्रतिक्रिया मिळालेली नाही. यासंदर्भात प्रशासनाचे स्पष्टीकरण मिळताच पुढील वृत्तांत प्रसिद्ध करण्यात येईल.

# स्वच्छ भारत मिशनचा फज्जा! पहिल्याच पावसात शौचालय पोखरलं – 'मृत्यूच्या दारात' ढकलणारा भ्रष्टाचार उघड!

## देऊटोला जिल्हा परिषद शाळेतील धक्कादायक वास्तव विद्यार्थ्यांच्या जीवाशी थेट खेळ!

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

-----------------------

गोरेगाव तालुका म्हसगाव ग्रामपंचायतअंतर्गत येणाऱ्या देऊटोला जिल्हा परिषद शाळेतील 'स्वच्छ भारत मिशन' अंतर्गत बांधलेले शौचालय पहिल्याच पावसात पोखरले! स्लॅब कोसळू लागले, प्लास्टर गळू लागले, गटार उघडं, झाकण नाही – थेट मुलांच्या जीवावर बेतणाऱ्या या रचनेमुळे संपूर्ण गाव आक्रमक झाला आहे.

लाखो रुपयांचा खर्च – पण काम अधांतरी आणि धोकादायक!

नोव्हेंबर २०२४ मध्ये सुरू झालेलं काम आज जून २०२५ पर्यंतही अपूर्ण आहे. ठेकेदाराने गेट मोडलं, कंपाऊंड वॉल तोडली – कोण देणार या सगळ्याची जबाबदारी? शाळा व्यवस्थापन समितीचा स्पष्ट आरोप आहे – "सरळ सरळ भ्रष्टाचार! ठेकेदाराची मुजोरी आणि प्रशासनाची झोप!"

"निकृष्ट साहित्य, खोटी कामं, पैशांचा अपहार, अभियंता व ठेकेदाराचं सार्टंलोटं!"– शाळा समिती सदस्य

सरपंचाची कबुली – पण कारवाई शून्य सरपंच तीलकचंद चौहान यांनाही कबुली द्यावी लागली









– " स्लॅब झरतंय, प्लास्टर उकरतंय, गटर झाकणाविना – आम्ही लवकरच कारवाई करू!" पण गावकऱ्यांचा इशारा स्पष्ट – "सात दिवसांत चौकशी न झाल्यास ग्रामपंचायतीला कुलूप ठोकू!", शाळा समितीचा आक्रोश – संपूर्ण गाव एकवटलं! शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्रीरामजी ठाकरे, सदस्य गणराज शेंद्रे, प्रकाश शेंद्रे, आशिष तुमडाम, चूनीलाल शेंद्रे, अनिल शहारे, विनोद शेंद्रे, कुसुमा ठाकरे, सरिताबाई शेंद्रे, पुणेस्वरी, राजू टेंभुर्णीकर आदींसह संपूर्ण गाव एकवटून आता लढ्याच्या तयारीत आहे.

" टेंडर प्रक्रिया, मटेरियल टेस्ट, क्वालिटी रिपोर्ट – सगळं लपवलं जातंय. पण गाव आता झाकणार नाही!"

प्रशासन गप्प – पण बिलासाठी हालचाली सुरू?

अजून MBCC तयार नाही बिल पास नाही, पण ठेकेदारचं दबावराज सुरू? ग्राम विकास अधिकारी व्ही.टी. कटरे म्हणाले – "काम अपूर्ण आहे, शाळेला भेट देतो, चौकशी करतो.", पंचायत समिती अभियंता मयुरी चौधरी यांनीही स्पष्ट केलं –, "काम पूर्ण होईपर्यंत बिल मंजूर केला जाणार नाही!" प्रश्न गंभीर – कोण जबाबदार?

नोडल अधिकारी, पंचायत समिती अभियंते, खंडविकास अधिकारी , ठेकेदार, ग्रामपंचायत , या सगळ्यांनीच डोळेझाक केली का? " या भ्रष्ट साखळीवर कारवाई झाली नाही, तर पुढचं आंदोलन रोखता येणार नाही!"– गावकऱ्यांचा स्पष्ट इशारा ही लाज नव्हे का? स्वच्छ भारत मिशनचा हेतू होता 'शौचालय प्रत्येकाच्या घरापर्यंत' – पण येथे शाळेच्या मुलांसाठी बनवलेलं शौचालयच त्यांचं "मृत्यूचं दार" ठरतंय!

हा केवळ एका इमारतीचा मुद्दा नाही – हा मुलांच्या जिवाशी निगडित प्रश्न आहे! आता प्रशासनासमोर दोनच पर्याय – कारवाई करा किंवा गावाची लाट सहन करा!

# जागतिक अमली पदार्थ विरोधी दिनानिमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये केली जनजागृती

सोमनाथ घोगांणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------





जागतिक अमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त न्यू इंग्लिश स्कूल नांदगाव या विद्यालयात नांदगाव पोलीस निरीक्षक श्री भदाने साहेब यांनी विद्यार्थ्यांना अमली पदार्थांपासून होणारे दुष्परिणाम व अमली पदार्थांच्या आहारी न जाण्याचे आव्हान केले. जस्ट ट्राय चे रूपांतर व्यसनामध्ये देखील होऊ शकते म्हणून या पदार्थांपासून लांब राहण्याचे आव्हान माननीय श्री भदाणे साहेबांनी केले. याप्रसंगी व्यासपीठावर विद्यालयाचा मुख्याध्यापिका श्रीमती काळे मॅडम व पर्यवेक्षक श्री शेवाळे सर उपस्थित होते. यानंतर जागतिक आम्ल पदार्थ विरोधी दिनानिमित्त प्रतीक म्हणून मा.श्री भदाने साहेबांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी विद्यालयातील हरित सेनेचे सहकार्य लाभले.

# स्वामी विवेकानंद संस्थेचे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी महाविद्यालयातील बी. फार्मसी च्या विद्यार्थ्यांचे NIPER - २०२५ परीक्षेमध्ये घवघवीत यश

सुनील म्हसदे
बागलाण तालुका प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------

मुंगसे ता. मालेगाव येथील स्वामी विवेकानंद संस्थेचे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी महाविद्यालयातील बी.फार्मसी च्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावर घेण्यात येणाऱ्या NIPER परीक्षा २०२५ मध्ये घवघवीत यश संपादन केले.

औषधनिर्माण विषयात पदव्यूत्तर पदवी अभ्यासक्रमात प्रवेश घेण्यासाठी हि परीक्षा महत्वाची मानली जाते NIPER हि परीक्षा दर वर्षी राष्ट्रीय स्तरावर नॅशनल टेस्टिंग एजेन्सी मार्फत घेतली जाते. महाविद्यालयातील ४ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवून महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले महाविद्यालयातील




भंडारी तीशा AIR ४३०८ ,केले किर्ती AIR २८५२ सूर्यवंशी श्रद्धा AIR ५०१२, धाखराव प्रेरणा AIR ५८३७ या यशस्वी विद्यार्थ्यांना वर्षभर मार्गदर्शन व सराव परीक्षा तसेच तज्ञ् प्राध्यापकांची विविध कार्यशाळा इत्यादी आयोजन फार्मसी कॉलेज प्राचार्य एम. बी. निकम व प्राद्यापक मोह्म्मद फैसल यांनी केले स्वामी विवेकानंद संस्थेचे सेक्रेटरी आदरणीय श्री. राजेंद्र रामचंद्र सूर्यवंशी, स्वामी विवेकानंद संस्थेच्या अध्यक्षा सौ. संगीता राजेंद्र सूर्यवंशी , तसेच स्वामी विवेकानंद संस्थेचे विश्वस्त श्री. सुजित सूर्यवंशी, सौ. रुचिता सूर्यवंशी व फार्मसी कॉलेजचे प्राचार्य एम. बी. निकम यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या. सर्व शिक्षक, शिक्षकत्तर कर्मचारी यांनी पण सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# नांदगाव शहरात मोकाट जनावरांचा प्रचंड सुळसुळाट.मोकाट जनावरांना वारसदार कोण?

सोमनाथ घोगांणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------

नांदगाव शहरात ठीक ठिकाणी मोठ्या प्रमाणात मोकाट जनावरांचा संचार वाढला असून,या मुळे शालेय विद्यार्थी, व वृद्धांसह नागरिकांना या मोकाट जनावरांचा नाहक मनस्ताप सहन करावा लागतं आहे.

नांदगाव शहरातील शनिमंदिर, नविन तहसील कार्यालय ' अहिल्यादेवी चौका 'कृषी उत्पन्न बाजार समिती येवला रोड आदी ठिकाणी मोकाट जनावरांची कळपे रस्त्यावर बसलेले असतात. यामुळे या रस्त्यांवर वाहतूक कोंडी होत असते. या मोकाट जनावरांना वारसदार कोणी आहे का? असा प्रश्न नांदगावकरांकडून विचारला जात आहे. तरी संबंधित विभागाने या मोकाट जनावरांचा लवकरात लवकर बंदोबस्त करावा अशी मागणी नांदगावकरांकडून केली जात आहे.



**मोकाट जनावरे रस्त्यात कळप करून भर रस्त्यात उभे राहत असल्याने रहदारीस मोठा अडथळा निर्माण होत असतो तसेच रस्त्याने जाणारे वाहन धारक, जेष्ठ नागरिक शालेय विद्यार्थी यांना नाहक त्रास सहन करावा लागत असून संबंधित विभागाने लवकरात लवकर या मोकाट जनावरांचा बंदोबस्त करावा.**
**भुषण धूत**

**मोकाट जनावरांच्या बाबतीत काळजीपूर्वक दखल घेण्यात येत असून ज्यांच्या मालकीचे जनावरे मोकाट असतील त्यांनी आपल्या जाणवरांचा त्वरित बंदोबस्त करावा अन्यथा त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल तसेच ज्या जनावरांना वारस कोणी नसेल अश्या जनावरांना गोशाळेत पाठवियची व्यवस्था केली जाणार आहे.**
**शशिकांत जाधव**

# वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता हवामानशास्त्र केंद्राने दिल्या सूचना १ जुलै या रोजी यलो अलर्ट.

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

---------------------

प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र मुंबई यांनी २७ जून २०२५ रोजी दुपारी १३:५७ वाजता दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी १ जुलै या एक दिवसासाठी यलो अलर्ट जारी केलेला आहे. १ जुलै २०२५ ह्या दिवशी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ३० ते ४० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा आणि जनतेने खबरदारी घ्यावी. नागरिकांनी खबरदारीची उपाययोजना म्हणून पुढील प्रमाणे काळजी घ्यावी. असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

**या गोष्टी करा**

विजेच्या गडगडाटासह पावसाची पूर्वकल्पना असल्यास बाहेर जाणे टाळा. जर मोकळ्या जागेत असाल आणि जवळपास कुठल्याही सुरक्षित इमारतीचा आसरा नसेल तर सखल जागेत जाऊन गुडघ्यात डोके घालून बसा. आकाशात विजा चमकत असल्यास घरात किंवा सुरक्षित इमारतीत आश्रय घ्या. घराच्या बाल्कनी, छत अथवा घराबाहेरील ओट्यावर थांबू नका. आपण घरात असाल आणि घरातील विद्युत उपकरणे चालू असतील तर त्या वस्तू त्वरित बंद करा. तारांचे कुंपण, विजेचे खांब व इतर लोखंडी वस्तूंपासून दूर रहा. पाण्यात उभे असाल तर तात्काळ पाण्यातून बाहेर पडा. तुमच्या स्मार्ट मोबाईल फोन मध्ये 'दामिनी', 'सचेत' हे दोन ॲप डाउनलोड करा 'दामिनी' ॲप तुमच्या आजूबाजूला वीज विषयक संभाव्य धोके दर्शविते तर 'सचेत' ॲप मुळे तुम्हाला तुमच्या आजूबाजूच्या हवामानाविषयी अचूक इशारे व माहिती मिळते.

**या गोष्टी करु नका**

आकाशात विजा चमकत असल्यास घरातील लँडलाईन फोनचा वापर करू नका. शॉवरखाली अंघोळ करू नका. घरातील बेसिनचे नळ, पाण्याची पाईपलाइन यांना स्पर्श करू नका तसेच कुठल्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नका. विजेच्या गडगडाटासह वादळी वारे चालू असताना लोखंडी धातूच्या सहाय्याने उभारलेल्या तंबूमध्ये किंवा शेडमध्ये आसरा घेऊ नका. उंच झाडाच्या खाली आसरा घेऊ नका. धातूंच्या उंच मनोऱ्याजवळ उभे टाकू नका. जर आपण घरात असाल तर उघड्या दारातून अथवा खिडकीतून वीज पडताना पाहू नका. हे बाहेर थांबण्याइतकेच धोकादायक आहे. असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist-Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

